# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/एआयसीटीई/2017-18/मान्यता/ ३०७४
दिनांक : 13 JAN 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे.

**विषय : शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करणे/ पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करणे, तसेच मुदतवाढीकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत...**

**संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची जाहिरात क्रमांक : अप्रुव्हल/12(11)/2016.(लोकसत्ता दिनांक : 2.1.2017)**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) नियम, 2016 चे विनियम नुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 5.1.2017 ते दिनांक 4.2.2017 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याकरीता व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करण्याकरिता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे ज्या संस्था प्रस्ताव सादर करणार आहेत, अशा संस्थांनी संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे तात्काळ संपर्क साधून विहित मुदतीत, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण 2013/प्र.क्र.43/तांशि-4, दि. 21.8.2013 मध्ये नमूद विहित शुल्क भरुन तपासणी हेतूने दिनांक 4.2.2017 पर्यंत किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदमार्फत वेळोवेळी अद्यावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापर्यंत प्रस्ताव सादर करुन तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत तपासणी करुन घ्यावी, अन्यथा संबंधीत संस्थांच्या प्रस्तावाची या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांची परिषद/ शासनाकडे शिफारस करण्यात येणार नाही यांची नोंद घेण्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचीत करण्यात यावे.

2 1 JAN 2017

पुढे असे ही कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याकरीता व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करण्याकरिता प्राप्त प्रस्तावांवर ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक 2017-18 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधीत संस्थांची तपासणी करुन सोबत जोडलेल्या तपासणी अहवालासह व खाली नमूद केल्या प्रमाणे विहीत मुदतीच्या **(दिनांक 4.2.2017 पर्यंत किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषेदमार्फत वेळोवेळी अद्यावत करण्यात येणाऱ्या अंतिम दिनांकापर्यंत)** आत कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा. विहीत मुदतीच्या आत प्रस्ताव/ अहवाल या संचालनालयास सादर न केल्यास याबाबतची जबाबदारी संबंधीत विभागीय कार्यालय व संबंधीत संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

1. ज्या संस्था विहीत तपासणी शुल्क / विहीत मुदतीत भरणार नाहीत, अशा संस्थांची तपासणी करण्यात येवू नये. संबंधीत संस्थांच्या प्रस्तावावर शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे शिफारस केली जाणार

नाही व त्यास संबंधीत संस्था/ ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील, याबाबत संबंधीत संस्थांना आपल्या स्तरावरुन जाणीव करुन देण्यात यावी.

2. प्रस्तावाची प्रत उपलब्ध झाल्यावर तसेच शासनाने विहीत केलेले नोंदणी शुल्क संबंधीत संस्थेने भरले आहे, याबात शहानिशा करुन आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये स्थापत्य/ उपयोजित यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक/ सहाय्यक प्राध्यापक/ विभागप्रमुख यापैकी एका सदस्याचा समावेश करण्यात यावा व सदर समितीने / अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधीत कागदपत्रे उदाहरणार्थ 7/12 चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लँडयुज प्रमाणपत्र, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र कांऊसिल ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधीत मुळ कागदपत्रांवरुन प्रत्यक्ष करण्यात यावी व त्यानुसार संबंधीत जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष 2017-18 पासून ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुकमध्ये नवीन संस्था सुरु करण्यासाठी व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करण्याकरिता विहीत केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे? याची तपासणी सादर केलेल्या कागदपत्रावरुन करण्यात यावी. तपासणी समितीचा अहवाल सोबतच्या **"प्रपत्र अ व प्रपत्र ब"** मध्ये अभ्यासक्रमनिहाय दर्शविण्यात यावा. सदर प्रपत्राच्या नमुन्याची प्रत सोबत जोडून तसेच ई-मेल व्दारे पाठविण्यात येत आहे.

3. तपासणी समितीतील सदस्यांना नियमाप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिकभत्ता देय राहिल.

4. पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्याबाबत आपल्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आपल्या विभागाशी संबंधीत संस्थांच्या प्रस्तावाची एक प्रत उपलब्ध करुन सदर प्रत सदर संस्थांच्या तपासणी अहवालांसोबत या संचालनालयास सादर करावी.

5. पदविका संस्था सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांचे अहवाल सोबतच्या **"प्रपत्र अ व प्रपत्र ब"** मध्ये अभ्यासक्रम निहाय (इंग्रजी टाईम्स न्यु रोमन फॉन्ट मध्ये भरुन एकत्रितरित्या व्दिप्रतीत खास दुतामार्फत आपल्या स्वंयस्पष्ट अभिप्रायांसह व आवश्यक कागदपत्रांसह तात्काळ या कार्यालयास सादर करावेत.

6. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करण्याकरिता प्राप्त प्रस्तावांचे तपासणी अहवाल सोबतच्या **"प्रपत्र क व प्रपत्र ड"** मध्ये अभ्यासक्रम निहाय (इंग्रजी टाईम्स न्यु रोमन फॉन्ट मध्ये भरुन एकत्रितरित्या व्दिप्रतीत खास दुतामार्फत आपल्या स्वंयस्पष्ट अभिप्रायांसह व आवश्यक कागदपत्रांसह तात्काळ या कार्यालयास सादर करावेत.

7. सोबतच्या **"प्रपत्र अ व प्रपत्र ब"** मध्ये तपासणी समिती तसेच विभागीय कार्यालयांनी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थेकरीता आपले **Recommended / Not-Recommended** स्पष्ट अभिप्राय **नमूद करावेत.**

8. पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था स्थापन करण्याबाबत प्रस्तावांवर शिफारस करतांना शैक्षणिक वर्ष 2017-18 साठीचा जिल्हानिहाय **बृहत आराखडा** विचारात घेण्यात यावा. सदर बृहत आराखड्याची प्रत या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर बाबत सुध्दा संबंधीत संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

याबाबत पुढे असेही कळविण्यात येते की, सदर काम तात्काळ पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व शासन अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधीत संस्थाप्रमुखांना आपल्या स्तरावर संबंधीतांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

तसेच सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष 2017-18 करीता फक्त **मुदतवाढ** (प्रवेशक्षमता वाढ/घट इ. नसल्यास) (**EOA**) मिळणेबाबत प्रस्ताव सादर करावयाचे असतील अशा संस्थांनी सदर प्रस्तावांची प्रत थेट या संचालनालयास सादर न करता, संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास सादर करावी. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्याबाबत या संचालनालयाच्या वतीने संबंधित संस्थांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत पोच

देण्यात यावी. पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे फक्त **मुदतवाढ (EOA)** मिळण्याबाबतचे प्रस्ताव थेट या कार्यालयात स्विकारण्यात येणार नाही यांची जाणीव संबंधीत संस्थांना करुन देण्यात यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१७/३००
दिनांक :- 23 JAN 2017

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करणे/पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेत रुपातंरण करणे, तसेच मुदतवाढीकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत संदर्भिय पत्रात दिलेल्या सुचना नुसार कार्यवाही करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सोबत :- १. संचालनालयाचे संदर्भिय पत्र.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.